महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ३१३ ते ३२५ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

आदिवासी विकास मंत्री	:	विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **आदिवासी विकास विभागाचा** सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षातील योजनेत्तर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

चार : औचित्याचे मुद्दे.

पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)

(१) **सर्वश्री. जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, सुरेश लाड, दिलीप वळसे-पाटील, अजित पवार, शशिकांत शिंदे, पांडुरंग बरोरा, वैभव पिचड, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. किसन कथोरे, संजय केळकर, संदीप नाईक, बळीराम सिरसकार, राणाजगजीतसिंह पाटील, दिपक चव्हाण, अब्दुल सत्तार, हसन मुश्रीफ, डॉ. सतीश पाटील, सर्वश्री. हनुमंत डोळस, दत्तात्रय भरणे, राहुल जगताप, राजेश टोपे, राहुल**

मोटे, ॲड.राहुल कुल, बाळासाहेब पाटील, सुनिल शिंदे, ॲड. भीमराव धोंडे, श्री. संतोष दानवे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"राज्यातील जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य विभागाने सन २०१६-२०१७ मध्ये केंद्रीय स्तरावर श्वान दंशावरील लसीची खरेदी न केल्यामुळे या लसीचा मोठया प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, राज्यात सुमारे अडीच लाख श्वानदंशाच्या घटना घडत असून त्यासाठी सुमारे १२ लाख वायलची खरेदी करण्यात येणे, शासनाकडून स्थानिक पातळीवर ही लस १३७ प्रतिवायल या दराने खरेदी करणे, भारत बायोटेक कंपनी हीच लस १२६ रुपये प्रतिवायल दराने उपलब्ध करुन देण्यास तयार असतांनासुध्दा ही लस त्या कंपनीकडून खरेदी करण्यात न येणे, त्यामुळे शासनाचे लाखो रुपयांचे होत असलेले नुकसान, परिणामी निविदा मागवून श्वानदंशावरील लसीची खरेदी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री.राजेश क्षीरसागर, प्रकाश आबिटकर, डॉ. सुजित मिणचेकर, सर्वश्री. चंद्रदीप नरके, सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर जिल्ह्यातील श्री अंबाबाईला घागरा-चोलीचा वेश परिधान करण्यात आल्यामुळे भाविक आणि श्रीपूजक यांच्यात निर्माण झालेला संघर्ष, श्री अंबाबाई मंदिर पुजारी हटाव संघर्ष समितीने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना पंढरपूर, शिर्डी, तुळजापूर येथील मंदिराप्रमाणे श्री अंबाबाई मंदिरातील हक्कदार पुजारी यांना काढून बहुजन समाजातील सुशिक्षित पुजा-यांची मुलाखत व लेखी परिक्षेद्वारे वेतनावर नियुक्ती करुन आणि विद्यमान पुजा-यांना १५ दिवसांत मंदिर प्रवेश बंद करावा अशी निवेदनाद्वारे केलेली मागणी, यासंदर्भात पंढरपूर देवस्थानच्या धर्तीवर करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात वेतनावर पुजारी नेमण्याबाबत जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने माहे जून, २०१७ मध्ये समिती स्थापन करुन तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे दिलेले आदेश, श्री अंबाबाई देवास्थांनामध्ये कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार होत असतांनाही याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली, व सिंधुदुर्ग जिल्हयातील देवस्थांनामध्ये कोटयवधी रकमेचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी सीआयडी मार्फत चौकशी करण्याचे शासनाने एक वर्षापूर्वी आश्वासन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी भाविकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **कु.प्रणिती शिंदे, ॲड. राहुल कुल, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"सोलापूर येथील शासकीय तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम हा टप्या-टप्प्याने बंद करण्याचा घेण्यात आलेला निर्णय, शासकीय तंत्रनिकेतन बंद न करता त्याच ठिकाणी उपलब्ध असलेल्या ३२ एकर जागेत शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय सुरु करण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, या भागातील विदयार्थ्यावर शासनाने घेतलेल्या निर्णयामुळे अन्याय होत असल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शासकीय तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम बंद होऊ नये यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई व मुंबई उपनगर क्षेत्रात चार ते पाच पिढयांपासून अनेक कुटुंबे पागडी तत्वावर (भाडे तत्वावर) राहत असणे, सदरची घरे साधारणपणे ६० ते ७० वर्षापूर्वीची असून सद्यःस्थितीत त्या घरांची झालेली दूरवस्था, तेथे राहत असलेल्या नागरिकांचा घरावर मालकी हक्क नसल्याने व घरमालक दुरुस्तीसाठी परवानगी देत नसल्याने रहिवाशांना जीव मुठीत धरुन रहावे लागत असणे, भाडेकरुंना घर मालकी हक्क देण्याबाबत महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ (सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८) मध्ये तरतूद नसल्याने शासनाने भाडेकरु देत असलेल्या भाडयाच्या १०० पट रक्कम शासन दरबारी जमा करुन कायदेशीरित्या त्यांना मालकी हक्क देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

सहा : शासकीय विधेयके :

(अ) विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, सुनील केदार, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९ - महाराष्ट्र मुद्रांक (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

---

(३) (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र**

जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५० — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (तिसरी सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ११ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ब) विधानसभेने संमत केलेले विधेयके महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-

सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २० — भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

सात : सभागृह नेते यांचा प्रस्ताव :-

"महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री, सन्माननीय खासदार, पद्मविभूषण श्री.शरदचंद्रजी पवार यांच्या संसदीय कारकिर्दीस ५० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तसेच महाराष्ट्र विधानसभेचे जेष्ठ सन्माननीय सदस्य, माजी मंत्री व माजी विरोधी पक्ष नेते श्री.गणपतराव देशमुख यांच्या संसदीय कारकिर्दीला ५५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्याबद्दलचा प्रस्ताव."

आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (सूचना क्र. १)

(१) **श्री. कुणाल पाटील, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र धुळे, नंदुरबार व जळगाव या तिन्ही जिल्हयांसाठी असणे, त्यामुळे धुळे व नंदुरबार जिल्हयातील विद्यार्थ्यांना ते गैरसोयीचे ठरत असणे, उत्तर महाराष्ट्रासाठी धुळे हे मध्यवर्ती ठिकाण असून विद्यार्थ्यांचा व पालकांच्या सोयी-सुविधांच्या दृष्टीने धुळे येथे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन होणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(गुरुवार, दिनांक ३ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना)

(क्रमांक २ व ३)

(२) **श्री.नरेंद्र पवार, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील आधारवाडी येथील कचरा क्षेपणभूमीची क्षमता संपल्याने ती शास्त्रोक्त पध्दतीने बंद करण्याचे आदेश दोन वर्षापूर्वी मा. उच्च न्यायालयाने देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न होणे, सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत तब्बल ४४ कोटी रुपयांचे अनुदान देऊन त्यामध्ये महानगरपालिकेने अर्धा हिस्सा भरुन सुमारे १७ कोटी रुपये खर्च करुन कचरा संकलन व वाहतुकीसाठी १२५ वाहने खरेदी करणे, तसेच उंबर्डे येथील २७ कोटी रुपये खर्च करुनही कचरा विघटन प्रकल्प सुरु करण्यात न आल्याने खर्च वाया जाणे, महापालिकेने उंबर्डे येथे पुन्हा हाच प्रकल्प राबविण्यासाठी ६० कोटी रुपयांच्या विकास आराखडयास सर्वसाधारण सभेने मंजुरी देऊन शासनाकडे पाठविणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **डॉ.देवराव होळी, वि.स.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.**

"गडचिरोली जिल्ह्यात मामा तलावांची संख्या मोठया प्रमाणावर असणे, जिल्ह्यात पावसाचे प्रमाण देखील मोठया प्रमाणावर असणे, मात्र या पाण्याचा व तलावांचा शेती व सिंचनाकरिता बारमाही उपयोग होत नसल्याचे निदर्शनास येणे, शेतकऱ्यांच्या हितासाठी व जिल्ह्याच्या विकासासाठी छत्तीसगडच्या धर्तीवर मामा तलावांमध्ये बारमाही पाण्याची सोय करण्याची आवश्यकता, मामा तलावांचे खोलीकरण, गावांतील नाल्यांचे पाणी तलावांमध्ये सोडणे यासारखी कामे झाल्यास सिंचन क्षमता वाढण्यास मदत मिळणे आवश्यक असणे, शासनाने या सर्व मामा तलावांवर बारमाही पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यासंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३ ऑगस्ट, २०१७.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.